उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळाच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालय, सिंधुदूर्ग येथील ५८ अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१९/प्र.क्र.८५/आरोग्य-४

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते. रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१.
तारीखः ११ एप्रिल, २०१९.

<u>वाचा</u>

1) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः अपदे-२०१८/प्र.क्र.११६/आरोग्य-४, दि.३०.१०.२०१८.**
2) **शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९.**
3) **सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-३/टे-१२/कोल्हापूरमंडळ, कोल्हापूर/अपदेमुदतवाढ/सन१९-२०/५३४१-४२/१९, दि.३.०४.२०१९**

<u>शासन निर्णय</u>

उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालय, सिंधुदूर्ग येथील ५८ अस्थाई पदांना संदर्भाधीन क्रमांक १ येथील दि.३०.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.१.१०.२०१८ ते दि.२८.०२.२०१० या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. या शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर यांच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालय, सिंधुदूर्ग येथील यासोबत जोडलेल्या विवरणपत्र “अ” मध्ये नमूद केलेल्या ५८ अस्थाई पदांना खालील अटींच्या अधीन राहून दि.१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

1) उपरोक्त पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त नाही व ज्या कारणांसाठी पदे मंजूर केली आहेत त्या अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.
2) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ नुसार विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे कार्यालयाचा पदविषयक सुधारित आकृतिबंध उच्चस्तरीय समितीकडून अंतिमत: मान्य करुन घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.
3) विहीत मुदतीत पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतन व भत्ताचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांची राहील.

सदर पदांवरील होणारा खर्च, मागणी क्र.आर-१,"२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ११०-रुग्णालये व दवाखाने, (०१)- मुफसल रुग्णालये व दवाखाने , (०१)(०१)- मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये (अनिवार्य) (२२१० ०१४६)" या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता मंजुर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाचा शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९१७०५१४४४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2019.04.11 15:46:51 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रत,

१. महालेखापाल, १/२,महाराष्ट्र (लेखा व लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा, प्रा.आ.केंद्र (जि.प.स्तर), मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.
६. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
७. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (लेखा व लेखापरिक्षा), पुणे.
८. जिल्हा शल्य चिकित्सक, सिंधुदूर्ग
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदूर्ग
१०. जिल्हा आरोग्य अधिकारी, सिंधुदूर्ग
११. वित्त विभाग (व्यय-१३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव (सेवा-२/ सेवा-३ / अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (आरोग्य- ४).

विवरण पत्र - अ

अ. क्र.	तात्पुरती पदे प्रथमतः निर्माण झाल्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	पदनाम	पदांची संख्या	वेतन श्रेणी पूर्ण	शेवटी पदे चालू ठेवण्यात आली त्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	ज्या तारखेपासून पदे पुढे चालू ठेवावयाची आहेत त्याचा दिनांक	लेखाशिर्ष पूर्ण	पदे पुढे चालू ठेवण्याच्या आवश्यकतेचे स्पष्टीकरण
1	**2**	**3**	**4**	**5**	**6**	**7**	**8**	**9**
1	शानिक्र. /बीबीटी/१०८५/ सीआर-३९/ आरोग्य-६ दि. २०.०८.१९८५	वैद्यकीय अधिकारी वर्ग-२	१	रु.१५६००-३९१०० ग्रेड पे	सा.आ.वि.शा.नि. क्रमांक अपदे-२०१८/प्र.क्र.११६/आरोग्य-४ दि.३० ऑक्टोबर, २०१८	दि. ०१/०३/२०१९ ते दि. २९/०२/२०२०	"२२१०- वैद्यकीय संवा व सार्वजनिक आरोग्य, ०१-नागरी आरोग्यसेवा- विषमचिकित्सा ११०-रुग्णालये व दवाखाने, १०-२ मुफसल क्षेत्रातील रुग्णालये व दवाखाने (०१)(०१)-मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने (२२१००१४६)"	रुग्णालयीन व कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे चालविणेसाठी आवश्यक
2		रक्तपेढी तंत्रज्ञ वर्ग-३	१	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
3	शानिक्र. /साआवि/जिरुसिं/ ६५९६/प्र.क्र. ४३/आरोग्य-३, दि.०७.०१.१९९७	अधिपरिचारिका वर्ग-३	१२	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
4		क्ष-किरण तंत्रज्ञ, वर्ग-३	१	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
5		शस्त्रक्रियागृह परिचर, वर्ग-४	१	रु.५२००-२०२०० ग्रेड पे १८००				
6	शा.नि.क्र. जिरुप/२१०५/ प्रक्र. १३०/आरोग्य ३/दिनांक १ मार्च २००६	वैद्यकीय अधिकारी वर्ग-२	२	रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४००				
7		परिसेविका वर्ग-३	३	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३००				
8		प्रयोगशाळा तंत्रज्ञ वर्ग-३	१	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
9		औषध निर्माता/ मिश्रक वर्ग-३	१	रु.५२००-२०२०० ग्रेड पे २८००				

अ. क्र.	तात्पुरती पदे प्रथमतः निर्माण झाल्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	पदनाम	पदांची संख्या	वेतन श्रेणी पूर्ण	शेवटी पदे चालू ठेवण्यात आली त्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	ज्या तारखेपासून पदे पुढे चालू ठेवावयाची आहेत त्याचा दिनांक	लेखाशिर्ष पूर्ण	पदे पुढे चालू ठेवण्याच्या आवश्यकतेचे स्पष्टीकरण
10	शा.नि.क्र. जिरुप/२१०५/ प्रक्र. १३०/आरोग्य ३/दिनांक १ मार्च २००६	रुग्णवाहिका चालक वर्ग-३	१	रु.५२००-२०२०० ग्रेड पे १९००	सा. आ.वि. शा. नि. क्रमांक अपदे-२०१८/प्र.क्र.११५/आरोग्य-४ दि.३० ऑक्टोबर, २०१८	दि. ०१/०३/२०१९ ते दि. २९/०२/२०२०	"२२१०- वैद्यकीय संवा व सार्वजनिक आरोग्य, ०१-नागरी आरोग्यसेवा- विषमचिकित्सा ११०-रुग्णालये व दवाखाने, १०-२ मुफसल क्षेत्रातील रुग्णालये व दवाखाने (०१)(०१)-मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने (२२१००१४६)"	रुग्णालयीन व कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे चालविणेसाठी आवश्यक
11		बाहयरुग्ण सेवक वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
12		अपघात विभाग सेवक वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
13		कक्षसेवक वर्ग-४	४	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
14		सफाईगार वर्ग-४	५	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
15		शिपाई वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
16		धोबी वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १६००				
17		पहारेकरी वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
18		वरिष्ठ लिपीक, वर्ग-३	१	रु.५२००-२०२०० ग्रेड पे २४००				
19		कनिष्ठ लिपीक/टंकलेखक, वर्ग-३	१	रु.५२००-२०२०० ग्रेड पे १९००				

अ. क्र.	तात्पुरती पदे प्रथमतः निर्माण झाल्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	पदनाम	पदांची संख्या	वेतन श्रेणी पूर्ण	शेवटी पदे चालू ठेवण्यात आली त्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	ज्या तारखेपासून पदे पुढे चालू ठेवावयाची आहेत त्याचा दिनांक	लेखाशिर्ष पूर्ण	पदे पुढे चालू ठेवण्याच्या आवश्यकतेचे स्पष्टीकरण
अतिदक्षता विभाग								
20	शा.नि.क्र. जिरुप/२१०५/ प्रक्र. १३०/आरोग्य ३/दिनांक १ मार्च २००६	महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग-२	१	रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४००	सा. आ.वि. शा. नि. क्रमांक अपदे-२०१८/प्र.क्र.११५/आरोग्य-४ दि.३० ऑक्टोबर, २०१८	दि. ०१/०३/२०१९ ते दि. २९/०२/२०२०	"२२१०- वैद्यकीय संवा व सार्वजनिक आरोग्य, ०१-नागरी आरोग्यसेवा- विषमचिकित्सा ११०-रुग्णालये व दवाखाने, १०-२ मुफसल क्षेत्रातील रुग्णालये व दवाखाने (०१)(०१)-मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने (२२१००१४६)"	रुग्णालयीन व कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे चालविणेसाठी आवश्यक
21		अधिपरिचारिका वर्ग-३	१	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
22		कक्षसेवक वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
23		सफाईगार, वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
नवजात बालक अतिदक्षता विभाग								
24	शा.नि.क्र. जिरुप/२१०५/ प्रक्र. १३०/आरोग्य ३/दिनांक १ मार्च २००६	अधिपरिचारिका वर्ग-३	१	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
25		आया (कक्षसेविका) वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
शुश्रूषा कक्ष विभाग								
26	शा.नि.क्र.जिरुप/२१०५/ प्रक्र.१३०/आरोग्य ३/दिनांक १ मार्च २००६	महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वर्ग-२	१	रु.१५६००- ३९१०० ग्रेड पे ५४००				
27		अधिपरिचारिका वर्ग-३	२	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
28		कक्षसेवक वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
29		सफाईगार, वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				

अ. क्र.	तात्पुरती पदे प्रथमतः निर्माण झाल्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	पदनाम	पदांची संख्या	वेतन श्रेणी पूर्ण	शेवटी पदे चालू ठेवण्यात आली त्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	ज्या तारखेपासून पदे पुढे चालू ठेवावयाची आहेत त्याचा दिनांक	लेखाशिर्ष पूर्ण	पदे पुढे चालू ठेवण्याच्या आवश्यकतेचे स्पष्टीकरण
शुश्रूषा प्रशिक्षण केंद्र विभाग								
30	शा.नि.क्र. जिरुप/२१०५/ प्रक्र. १३०/आरोग्य ३/दिनांक १ मार्च २००६	पाठयनिर्देशिका	१	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४४००	सा.आ.वि.शा.नि. क्रमांक अपदे-२०१८/प्र.क्र.११५/आरोग्य-४ दि.३० ऑक्टोबर, २०१८	दि. ०१/०३/२०१९ ते दि. २९/०२/२०२०	"२२१०- वैद्यकीय संवा व सार्वजनिक आरोग्य, ०१-नागरी आरोग्यसेवा- विषमचिकित्सा ११०-रुग्णालये व दवाखाने, १०-२ मुफसल क्षेत्रातील रुग्णालये व दवाखाने (०१)(०१)-मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने (२२१००१४६)"	रुग्णालयीन व कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे चालविणेसाठी आवश्यक
मनोविकृती चिकित्सा विभाग								
31	शा.नि.क्र.जिरुप/२१०५/ प्रक्र.१३०/आरोग्य ३/दिनांक १ मार्च २००६	अधिपरिचारिका वर्ग-३	१	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
32		कक्षसेवक वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
33		सफाईगार, वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
ट्रामा केअर युनिट विभाग								
34	शा.नि.क्र.जिरुप/२१०५/ प्रक्र.१३०/आरोग्य ३/दिनांक १ मार्च २००६	अधिपरिचारिका (स्टाफ नर्स) वर्ग-३	१	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
35		वॉर्डबॉईज (कक्षसेवक), वर्ग-४	१	रु.४४४०-७४४० ग्रेड पे १३००				
सि.टी.स्कॅन विभाग								
36	शा.नि.क्र.जिरुप/२१०५/ प्रक्र.१३०/आरोग्य ३/दिनांक १ मार्च २००६	क्ष-किरण तंत्रज्ञ वर्ग-३	१	रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
	एकूण		**५८**					